CNRNO.MHYA100009962020

दि.कि.अ.क्र.२५/२०२०

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२५/२०२० मधील नि.क्र.२० खालील

## आदेश

## (दिपाली व इतर –वि– दत्तात्रय व इतर)

**१.** प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांनी लेखी उत्तर जबाब सादर करण्यासाठी झालेला विलंब माफ करुन त्यांना लेखी उत्तर सादर करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

**२.** प्रस्तुत अर्जातील गैरअर्जदार यांचे कथन की, गैरअर्जदार क्र. ०२ ही वयोवृध्द असल्याने ती सतत आजारी असल्या कारणाने गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ हे विहीत मुदतीत आपले लेखी उत्तर सादर करु शकले नाही. करीता झालेला विलंब माफ करुन त्यांना प्रकरणात आपले लेखी उत्तर सादर करण्याची परवानगी देण्यात यावी. शेवटी प्रस्तुतचा अर्ज केलेल्या विनंतीप्रमाणे मंजूर करण्यात यावा अशी मागणी गैरअर्जदार यांनी केली आहे. प्रस्तुत अर्जास अर्जदारांचे विधिज्ञांनी जोरदार हरकत घेतली असून जर सदरचा अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास रु. ५,०००/– खर्च लादण्यात यावा असे त्यांनी नमूद केले.

Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Date: 2026.07.30 17:44:15 +0530

**३.** मी दोन्ही बाजूंकडील सुविज्ञ विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरणात गैरअर्जदार क्र. ०१ व ०२ यांना अर्ज निशाणी क्र. १९ वरील दिनांक १६/०३/२०२६ रोजीचे आदेशान्वये अर्जदार यांनी दि. २७/०३/२०२६ रोजी सामील केले आहे. परंतु विहित मुदतीत त्यांनी आपले उत्तर सादर केले नाही. अभिलेखाचे

अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचे प्रकरण गैरअर्जदार यांच्या लेखी उत्तराशिवाय चालविण्यात यावा असे आदेश अद्याप पारित करण्यात आले नाही. प्रकरणात सामिल केल्यानंतर गैरअर्जदार यांनी विहीत मुदतीत आपले लेखी उत्तर दाखल करणे अपेक्षित होते. परंतु त्यांनी दि. ०६/०७/२०२६ रोजी या अर्जासोबत आपले लेखी उत्तर सादर केले आहे. त्यांना सदरचे लेखी उत्तर दाखल करण्यास विलंब देखील झाल्याचे दिसून येते.

**४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये दोन्ही बाजूकडील पक्षांचे हितसंबंध, समाविष्ट आहेत. त्यामुळे दोन्ही बाजूंचे म्हणणे अभिलेखावर येवून उभयपक्षांमधील वाद गुणवत्तेवर निकाली योग्य राहिल. त्यामुळे गैरअर्जदार यांना आपले लेखी उत्तर या प्रकरणात दाखल करण्याची संधी देणे योग्य असल्याचे दिसून येते. प्रस्तुतच्या अर्जासोबत गैरअर्जदार यांनी लेखी उत्तर देखील दाखल केले आहे. अर्जदार यांनी जरी या अर्जास हरकत घेतली असली तरी सदरची हरकत सदरचा अर्ज नामंजुर करण्याइतपत सबळ नसल्याचे दिसून येते. सबब, वरिल विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रती पोहचलो आहे की, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य राहिल.

Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI Date: 2026.07.30 17:44:21 +0530

## <u>आदेश</u>

१. अर्ज नि.क्र.२० हा मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यांना लेखी उत्तर दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवून त्यांना प्रकरणात लेखी उत्तर दाखल

**CNRNO.MHYA100009962020**

दि.कि.अ.क्र.२५/२०२०

करण्याची परवानगी देण्यात येते.

३. दोन्ही बाजूकडील पक्षकार व त्यांचे विधीज्ञ यांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by FAJILODDIN KHALILODDIN SIDDIQUI
Date: 2026.07.30 17:44:27 +0530

दिनांक ३०/०७/२०२६.

(एफ.के. सिद्दीकी)
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
**केळापूर**

CNRNO.MHYA100009962020

दि.कि.अ.क्र.२५/२०२०

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. R. Gulhane |
| Court Name | : | Jt. CJJD Court Kelapur |
| Date | : | 30/07/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 30/07/2026 |
| Judgment uploaded on | : | 30/07/2026 |

**XXXX**